**"शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधी "या नावाने कल्याण निधीची स्थापना करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक- माजम-२००९/५७३/प्र.क्र.१०४/३४.**
**मंत्रालय, मुंबई- ४०००३२.**
**दिनांक - १ जून, २०१०.**

**वाचा**:- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- माजम-२००९/५७३/प्र.क्र.१०४/३४ दिनांक १/८/२००९
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- माजम-२००९/५७३/प्र.क्र.१०४/३४ दिनांक १९/३/२०१०

**शासन निर्णय :-**

पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा आकस्मित मृत्यू झाल्यास त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियास मदत करण्याच्या उद्देशाने शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीची स्थापना करण्यास वर नमूद केलेल्या दिनांक १/८/२००९ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर निधीच्या व्यवस्थापनासाठी स्थापन करावयाच्या विश्वस्त संस्थेच्या (Trust) कार्यकारी मंडळावर ११ सदस्यांची नियुक्ती वर नमूद केलेल्या दिनांक १९/३/२०१० च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली होती. आता सदर दि. १९/३/२०१० चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन तसेच दि.१/८/२००९ च्या शासन निर्णयात "महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांचे अध्यक्षतेखाली" या ऐवजी "प्रधान सचिव/सचिव, माहिती व जनसंपर्क" यांचे अध्यक्षतेखाली असा अंशतः बदल करुन शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या व्यवस्थापनासाठी स्थापन करावयाच्या विश्वस्त संस्थेच्या (Trust) कार्यकारी मंडळावर खालील सदस्यांची नियुक्ती करण्यास याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अ) शासकीय सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव/सचिव, माहिती व जनसंपर्क | अध्यक्ष |
| २ | महासंचालक, माहिती व जनसंपर्क , मुंबई | सदस्य सचिव |
| ३ | उपसंचालक (लेखा)माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई | खजिनदार |
| ४ | उपसचिव/ सहसचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |

**ब) अशासकीय सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. प्रफुल मारपकवार | आर.बी. ३/२६९/१, सेंट्रल रेल्वे कॉलनी, परळ, मुंबई-४०० ०१२ |
| २ | श्री. कमलाकर रामदेव जोशी | ९२,अष्टविनायक नगर, राजराजेश्वर कृपा निवास तरोडा खु.,जिल्हा नांदेड-४३१६०५ |
| ३ | श्री. संजीव पंढरीनाथ उन्हाळे | बी-४,प्राईड पार्क, तिवारी मंगल कार्यालयाजवळ, वेदांत नगर, एम.आय.डी.सी.रेल्वे स्टेशन, औरंगाबाद. |
| ४ | श्री. मोरेश्वर विश्वनाथ बडगे | पत्रकार सहनिवास, सिव्हिल लाइन्स, नागपूर . |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री. उत्तम कांबळे | चार्वाकाशय, हरिकृपा सोसायटी जवळ, टी.बी.सॅनेटोरियम रोड, पिंजोरी रोड, म्हसरुळ, काकासाहेब देवधर शाळेसमोर नाशिक- ४२२ ००४. |
| ६ | श्री. प्रकाश बाळासाहेब जोशी | सी-३०३, स्वप्न नगरी, मलुंड (पश्चिम) मुंबई-४०००८० |
| ७ | श्रीमती राही विलास भिडे | ३, डी-१०६, वैशाली नगर, के.के.रोड, जेकब सर्कल, महालक्ष्मी, मुंबई-४०० ०११ |

२. वर नमूद केलेल्या कार्यकारी मंडळाच्या ११ सदस्यां व्यतीरिक्त प्रस्तावित विश्वस्त संस्थेच्या कार्यकारी मंडळावर खालीलप्रमाणे १० निमंत्रित सदस्यांची नियुक्ती करण्यासही या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**क) निमंत्रित शासकीय सदस्य**

| | |
|---|---|
| १ | उपसचिव / सहसचिव, गृह विभाग |
| २ | उपसचिव/सहसचिव , कार्यासन ३४ सामान्य प्रशासन विभाग |

**ड) निमंत्रित अशासकीय सदस्य**

| | |
|---|---|
| १ | अध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद किंवा पुरस्कृत प्रतिनिधी |
| २ | अध्यक्ष, महाराष्ट्र दैनिक वृत्तपत्र संघटना किंवा पुरस्कृत प्रतिनिधी |
| ३ | अध्यक्ष, मंत्रालय आणि विधी मंडळ वार्ताहर संघ किंवा पुरस्कृत प्रतिनिधी |
| ४ | अध्यक्ष, बृहन्मुंबई जिल्हा वृत्तपत्र संपादक संघ किंवा पुरस्कृत प्रतिनिधी |
| ५ | अध्यक्ष, महाराष्ट्र साप्ताहिक वृत्तपत्र संपादक परिषद किंवा पुरस्कृत प्रतिनिधी |
| ६ | अध्यक्ष, महाराष्ट्र संपादक परिषद किंवा पुरस्कृत प्रतिनिधी |
| ७ | अध्यक्ष, इलेक्ट्रॉनिक माध्यमे पत्रकार संघटना किंवा पुरस्कृत प्रतिनिधी |
| ८ | अध्यक्ष, महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघ किंवा पुरस्कृत प्रतिनिधी |

३. सदर कार्यकारी मंडळावरील सर्व अशासकीय सदस्यांना कार्यकारी मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक- प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ३/३/२०१० च्या परिच्छेद १२ मधील तरतूदीनुसार रुपये ८९००/- व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणा-या शासकीय कर्मचा-यांच्या दराने प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. मात्र त्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकुलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

४. हा शासन निर्णय , महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००६०११७१३४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
( तु. वि. लव्हटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

सर्व सदस्य , प्रस्तावीत विश्वस्त संस्था,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
मा. मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री ( मा. व ज.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव / सचिव,मा. व ज  सामान्य प्रशासन विभागा/वित्त विभाग /
विधी व न्याय विभाग/  सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई,
स्वीय सहाय्यक, सह/उप सचिव सामान्य प्रशासन विभाग(मा. व ज.)/सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,  मुंबई
धर्मादाय आयुक्त , वरळी , मुंबई,
उपसंचालक (वृत्तशाखा), (प्रकाशने ) यांजकडे प्रसिध्दीसाठी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
उपसंचालक (माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली,
सर्व उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
सर्व जिल्हा माहिती  अधिकारी,
महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता) , मुंबई/नागपूर,
महालेखापाल १/२ ( लेखापरिक्षा) मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी , मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
निवडनस्ती.